//०८//

<u>वादी यांचा उलटतपास प्रति तर्फे विधीज्ञ श्री. एस. पी. भालेराव यांचेकडून शपथेवर सुरु -</u>

१. मौजे लोणी येथे गट क्र. ४३९ आहे. मी चतु:सिमा सांगु शकते. पश्चिमेस विकास शिंदे, दक्षिणेस विलास घोरपडे, उत्तरेस अरुण शिंदे आणि पूर्वेस विष्णु शिंदे यांची मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये आम्ही दोन एकर ऊस लावलेला होता. दोन एकर ऊसापैकी दीड एकर ऊस जळालेला आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे जळालेला ऊस टेप लावुन मोजलेला आहे. ऊस मोजला तेंव्हा त्यावेळी माझे दीर विष्णु शिंदे हजर होते. गट क्र. ४३९ चा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सातबारा उता-यावर सन २०१४ – १५ या कालावधीमध्ये ऊसाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर कालावधीमध्ये ज्वारी पिकाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सातबारा उता-यावर विहिर आणि बोर अशी नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऊस पिकाला पाणी कमी पडत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे ऊस चांगल्याप्रकारे पोसला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऊस पिकास कोणत्याही प्रकारची खते आम्ही टाकली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, खत आणल्याबाबतच्या पावत्या दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४-१५ या कालावधीमध्ये केवळ भैरवनाथ हा एकमेव कारखाना होता. हे म्हणणे खरे नाही की, ऊस खराब असल्यामुळे कारखान्याकडे नेणेत आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, ऊस ओला असल्यामुळे पूर्ण जळत नाही. हे म्हणणे खरे की, ओला ऊस जळाला नसल्यामुळे उभा असतो. हे म्हणणे खरे नाही की, ऊस जळाल्यानंतर कारखान्यामार्फत ऊस लवकर नेला जातो. हे म्हणणे खरे नाही की, कारखान्याने ऊस नेला नाही त्यामुळे आम्ही स्वत: ऊस पेटवला होता. हे म्हणणे खरे नाही की, जळालेला ऊस कारखान्याने नेला नाही त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचेकडुन रक्कम मिळवण्याकरीता खोटा दावा दाखल केला आहे. सन २०१४-१५ या कालावधीमध्ये ऊसाकरीता कारखान्याचा किती दर होता हे दाखविण्याकरीता दरपत्रक दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर कालावधीमध्ये २५५० रुपये भाव होता हे खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, ठिबक संच व पाईपलाईन जळाली होती हे खोटे

सांगते. हे म्हणणे खरे नाही की, ठिबक संच व पाईपलाईन कोठून आणली होती हे दाखविणेकरीता पावत्या दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, हमीभावाचा कोणत्याही कागदाची पडताळणी न करता रकमेची मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशन, तलाठी व तहसील ऑफीस यांचेशी संगणमत करून खोटे पंचनामे केले आहेत. एल.टी. लाईनच्या तारा लुज होत्या याबाबत मी प्रतिवादी यांचेकडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडे अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, ऊसाला एकरी पंचेवीस हजार रुपये खर्च आला होता हे खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, ठिबक संच व इतर याची किंमत साठ हजार रुपये होती हे खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, लाईट बील मागणेकरीता प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कर्मचारी आमचेकडे येत असल्यामुळे त्यांना हाकलुन लावण्याकरीता खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तारेचे घर्षण झाले आणि त्यामुळे ठिणग्या पडुन ऊस जळाला हे खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाईचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by YADAV JYOTI NANASAHEB
Date: 2025.01.09 11:54:43 +0530

दिनांकः ०८.०१.२०२५

(श्रीमती. जे. एन. यादव)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
परंडा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues are same, word to word, as per the original judgment/order/issues.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. J. N. Yadav<br>Jt. Civil Judge, Senior Division, Paranda, District - Osmanabad. |
| Date | --- | 08/01/2025 |
| Judgment/order/issues signed by the Presiding Officer on | --- | 08/01/2025 |
| Judgment/order/issues uploaded on | --- | 09/01/2025 |